गणपती बाप्पा मोरया!

दरवर्षी प्रमाणेच याही वर्षी महाराष्ट्र मंडळ ऑफ डेट्रॉईटचा 'वरदविनायक' हा गणेशउत्सवाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.... नुसतंच 'उत्साहात' म्हणण्यापेक्षा; 'धुमधडाक्यात' म्हणणं जास्त उचित ठरेल... याला कारण प्रणव औंधकर आणि त्याच्या सहकाऱ्यांनी दहा ढोलांपासून तेहतीस ढोलांपर्यंत वाढवत नेलेलं मंडळाचं ढोल-ताशा पथक! सकाळी दहाच्या सुमारास पारंपरिक मराठी पोशाख केलेले ढोल-ताशा पथकातले वादक... हो, त्यात नऊवारी नेसून, पुरुषांच्या बरोबरीने, ढोल वाजवणाऱ्या महिलांचाही समावेश होता.... त्यांच्याबरोबर असलेले लेझीम पथक, भगवा ध्वज नाचवणारे उत्साही कार्यकर्ते, ताशांचा तडतडाट आणि या सर्वांना धरून ठेवणारा टोलाचा ठेका!.... यांनी वाजतगाजत, मिरवत गणरायाचे आगमन केले. हे सर्व ऐकतांना, सहभागी सदस्यांचा उत्साह बघतांना; महाराष्ट्रातील गणपतींच्या मिरवणुकांची आठवण नक्कीच होत होती. गणरायांचे आगमन झाल्यावर मंडळाच्या फाटक गुरुजींनी गणेशपूजेला प्रारंभ केला. या वर्षी अद्वैत पिंगळे पूजेला बसला होता. पूजेनंतर विविध आरत्यांच्या गजरात, सातशेहून अधिक लोकांच्या उपस्थितीत श्रींची खऱ्या अर्थाने प्राणप्रतिष्ठा झाली. मंडळाच्या कार्यक्रमांच्या वेळी अविभाज्य भाग बनलेली 'रांगोळी' ही होतीच! भारती मेहेंदळे, मंजिरी महाजन आणि सहकाऱ्यांनी या वेळेस पाना-फुलांची सुरेख रांगोळी काढून गणेशाच्या सजावटीत भर घातली होती. दर्शन-आरती नंतर तीर्थप्रसादात पिंजरकर काकूंनी घरी बनवलेले मोदक होतेच! पिंजरकर काकू १९७८ सालापासून दर वर्षी, नेमाने मंडळाच्या गणपतीच्या कार्यक्रमासाठी, अथर्वशीर्षाच्या फलश्रुतीत सांगितलेले, 'यो मोदक सहस्रेण यजति'.... मोदक शेकड्यांनी बनवून प्रसादासाठी आणताहेत. अर्थात मंडळाचा आवाका आणि वाढलेला पसारा लक्षात घेता इतरही कार्यकर्त्यांची त्यांना मदत होत असतेच; पण हा सारा 'घेतला वसा' भगवद्गीतेतल्या 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' च्या चालीवर कुठल्याही फळाची अपेक्षा न ठेवता चाललेला असतो!

आलेल्या सभासदांची नावनोंदणी करणं, त्यांना wristbands देणं, मंडळाच्या 'स्नेहबंध' अंकाच्या प्रतींचे वाटप करणं यात रजिस्ट्रेशन टीम गर्क होती; तर दुपारच्या भोजनाची सिद्धता करण्यासाठी फूड टीम झटत, राबत होती.... साधी गोष्ट आहे - साडे सातशे हुन अधिक लोकांच्या जेवणाची व्यवस्था करणं म्हणजे 'खायचं काम' नाही!! वरण-भात (त्यावर तुपाची धार), आळूची पातळ भाजी, उसळ, साधी पोळी, पुरणपोळी (पुन्हा तुपाची धार आहेच) शिवाय अजून एक 'स्वीट डिश' असा भरगच्च .... म्हणजे अक्षरशः घेतलेलं ताट 'गच्च भरेल' असा मेनू होता. यात कमी

म्हणून कि काय; एक 'चमचमीत करी' अजून होती!! अशा सुग्रास जेवणावर अक्षरशः आडवा हात मारून जड अंतःकरणाने म्हणावं तसं 'जड पोटाने' (आणि काहीशा पेंगुळलेल्या डोळयांनी) लोकं ऑडिटोरियम कडे पुढील कार्यक्रमासाठी वाटचाल (कशीबशी) करत होती. काहींनी 'ऑडिटोरियम मध्ये झोपायची सोय आहे का?' अशीही विचारणा मंडळाच्या स्वयंसेवकांकडे केली. पण कसलेल्या फूड कमिटीच्या टीमने त्यांचे मनोरथ धुळीस मिळवत ऑडिटोरियमच्या दारापाशीच गरमागरम चहाची व्यवस्था तयार ठेवली होती. (फूड कमिटी कि जय हो!) बच्चे कंपनीने (आणि त्यांच्या कोरिओग्राफर्सनी) घेतलेल्या मेहेनतीवर पाणी पडू द्यायचे नव्हते!

मंडळाच्या शिरस्त्याप्रमाणे गणेशउत्सवाचा कार्यक्रम हा लहान मुलामुलींच्या विविध कलागुण दर्शनासाठी राखून ठेवलेला असतो. कार्यक्रमाची सुरुवात मुलांनी केलेल्या अमेरिका आणि भारत या दोनही देशांच्या राष्ट्रगीतांच्या समूहगायनाने झाली. भारताचे राष्ट्रगीत गाऊन झाल्यावर 'भारत माता की' या स्टेजवरून मुलांनी केलेल्या आवाहनाला; प्रेक्षगृहात उभ्या असलेलया यच्चयावत साऱ्या प्रेक्षकांनी 'जय' असा खणखणीत प्रतिसाद दिला! गमक, ताल, अस्मि यांच्यासारख्या शास्त्रोक्त ॲकॅडमी, तसंच Funaach Academy of Dance सारख्या आजच्या पिढीशी नातं सांगणाऱ्या नृत्य प्रशिक्षण संस्थांपासून; वर्षा अंबर्डेकर पासून ते नव्याने आलेल्या इतर कोरिओग्राफर्सनी मंडळातील सभासदांच्या मुलामुलींकडून विविध गाणी, नृत्याविष्कार, skits बसवून घेतले होते. हे कार्यक्रम सादर करणाऱ्या मुलांचं कौतुक तर आहेच; पण त्याबरोबरच या कोरिओग्राफर्सचं! वयोगट पाच ते पंधरा या सर्व मुलामुलींचे मूड्स सांभाळत, त्यांच्या कलाकलाने घेत, अपेक्षित 'कला' त्यांच्याकडून काढून घेणं सोपं नाहीये!! फक्त वीकेंड्सना चालणाऱ्या प्रॅक्टिसेस, आयत्या वेळेस कोणीतरी 'समर व्हेकेशन' ला गेलंय, कोणाच्या दुसऱ्या एखाद्या क्लासची वेळ क्लॅश होतीये, कोणी पालक कार-पूल करताहेत.... एक ना अनेक अडचणींवर मात करत हे कार्यक्रम बसवले जातात. स्टेजवर सादर करतांना आयत्या वेळेस मुलं off center जातात, बुजलेली काही मुलं, त्यामानाने धीट मुलांकडे कडे बघत, त्यांचं अनुकरण करत; थोडा 'delayed performance' करत असतात, प्रेक्षागृहातले प्रेक्षक आपापल्या मुलांच्या कार्यक्रमाचे फोटो, व्हिडीओ शूटिंग करण्यात व्यस्त असतात..... पण या सर्वांवर मात करत असतो; तो बालचमुचा अमाप उत्साह! Fully Charged असलेली हि मुलं या कार्यक्रमाचा अखंड ऊर्जास्रोत असतात. या अशा उत्साही (आणि काही अतिउत्साही) शंभराहून अधिक मुलामुलींचा उत्साह काबूत ठेवून, लागेल तशी त्यांना केशभूषा, वेशभूषा यांत मदत करून; त्यांच्या कार्यक्रमाच्या क्रमाक्रमाने स्टेजवर पाठवणे आणि काही 'बाल'कलाकारांना bow घेऊन झाल्यावर विंगेत परत आणणे; ही महत्वाची जबाबदारी वर्षा पाथरे यांनी सांभाळली होती.

माझ्यासारख्या जुन्या खोडांना आठवणींची नवीन पालवी फुटत असते.... empty nesters झालेले माझ्यासारखे बरेच जण स्टेजवर आपली लहान मुलं.... किंवा फोटो काढायला धडपडणाऱ्या पालकांमध्ये स्वतःला शोधत असतात..... काही आजी-आजोबा नातवंडांचं कौतुक करायला, भरल्या डोळ्यांनी आलेले असतात....

अतिशय सुरेख चाललेल्या या कार्यक्रमास मागे स्क्रीनवर चालू असलेल्या विविध बॅकड्रॉप्सने (credit goes to विक्रांत पटवर्धन) अधिकच उठाव आणला होता. स्टेजची सजावट करणारे, माईक-साउंडची व्यवस्था बघणारे, लाईटची व्यवस्था बघणारे असे मंडळाच्या कार्यकारिणीचे असंख्य हात; हा कार्यक्रम अधिक देखणा होईल याची खबरदारी घेत होते. कार्यक्रम लहान मुलांसाठी राखीव असल्याने कायक्रमाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारीही 'युथ कमिटी' कडेच होती. माया डहाणूकर, महिमा महाजन आणि हिरण्मयी पिंगळे या मुलींनी रंगमंचावरील कलाकारांच्या उत्साहाला साजेसे सूत्रसंचालन करून कार्यक्रम कुठेही रेंगाळणार नाही याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले. प्रोग्रॅम मॅनेजर महेश बिरादार आणि सिद्धार्थ कुलकर्णी यांनी फूड कमिटी, डेकोरेशन टीम, रजिस्ट्रेशन कमिटी, युथ कमिटी, प्रोग्रामिंग टीम अशा सर्व समितींमध्ये सुरेख समन्वय साधत मंडळाचा अजून एक कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला.

मंडळाचा अध्यक्ष मनोज पाटील याने कार्यक्रमाच्या सुरुवातीस सांगितल्याप्रमाणे, गेल्या दोन वर्षात जरी कोविडचा प्रादुर्भाव होता; तरीही गेल्या वर्षी आणि या वर्षीही इतर कुठल्याही कार्यक्रमापेक्षा अधिक गर्दी 'विघ्नहर्त्याच्या' कार्यक्रमास झालेली होती.

‘विविध कलागुण दर्शनाच्या’ कार्यक्रमानंतर नेहेमीप्रमाणे आरती होऊन, पुन्हा एकदा ढोल-ताशाच्या गजरात विसर्जनाची मिरवणूक काढण्यात आली. 'पुढच्या वर्षी लवकर या' असा प्रेमळ निरोप लाडक्या बाप्पाला देत; कार्यक्रमाची सांगता झाली.